प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१३ – २०१४

राष्ट्रीय सेवा योजना – विद्यापीठस्तरीय कार्यशाळा

सकाळ

रविवार,
१६ मार्च २०१४

७

## हिंसाचाराविरुद्ध महिलांनी पुढे यावे : ॲड. कोटबागी

राजगुरुनगर, ता. १५ : 'कौटुंबिक हिंसाचार हा मानवी अधिकाराचा विषय आहे. त्यापासून संरक्षण देणारा कायदा हा महिलांसाठी आत्मसन्मान मिळवून देणारा आहे. परंतु, महिलांनी हिंसाचाराविरुद्ध निर्भयपणे पुढे यावे,' असे आवाहन ॲड. सुलभा कोटबागी यांनी राजगुरुनगर येथील कार्यशाळेमध्ये केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना पुणे विद्यापीठ यांच्या वतीने विद्यापीठस्तरीय घरगुती हिंसाचार व प्रतिबंध कायदा प्रशिक्षण कार्यशाळा गुरुवारी झाली. जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या ३०० विद्यार्थिनी यात सहभागी झाल्या होत्या. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. कार्यशाळेत वकिलांनी या कायद्यामधील विविध कलमांची ओळख करून दिली.



ॲड. सुलभा कोटबागी

पुरुषांच्या संपत्तीत महिलांना हक्क, नोकरीत व राजकारणात आरक्षण, पोटगीचा कायदा, कामगार कायदा, स्त्रीभ्रूणहत्याविरोधी कायदा याबाबतही माहिती दिली. या प्रसंगी संचालक साई शिंदे, ॲड. रिना मंडलिक, ॲड. जनाबाई पुंडे, ॲड. पल्लवी काळे, प्राचार्य एस. बी. पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. दिलीप मुळूक यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख